दिनांक 22/०३/२०२२

# -:- प्रेसनोट -:-

फिर्यादी यांच्या मुलाच्या नावावर करंजगाव ता. वैजापुर जिल्हा औरंगाबाद येथील हॉटेल ब्ल्यु मुन बियरबार परमीटरुम सुरळीत चालु ठेवण्यासाठी व कारवाई न होवूदेण्यासाठी आरोपी लोकसेवक श्री.हुकुमसिंग दौलतसिंग डांगर, वय 57 वर्षे, पद-सहाय्यक फौजदार, नेमणुक पो.ठाणे वैजापुर जिल्हा औरंगाबाद यांनी रुपये 20000/-लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम स्विकृती केल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबादच्या जाळ्यात.

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | औरंगाबाद |
| गुन्हा नोंद क्रं. | :- | पोलीस ठाणे जहवाहरनगर औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| आलोसे यांचे नाव हुद्दा व पत्ता | :- | श्री.हुकुमसिंग दौलतसिंग डांगर, वय 57 वर्षे, पद-सहाय्यक फौजदार, नेमणुक पो.ठाणे वैजापुर जिल्हा औरंगाबाद, रा. शिवशंकर कॉलनी, प्लॉट नं.07, गट नं.192/4 हर्सुल औरंगाबाद. वर्ग-3 |
| लाच मागणी रक्कम | :- | 20000/- रुपये |
| लाच स्विकृती रक्कम | :- | 20000/-रुपये |
| तपास अधिकारी | :- | श्री. हनुमंत वारे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| थोडक्यात माहिती | :- | यातील तक्रारदार यांच्या मुलाच्या नावावर करंजगाव ता. वैजापुर जिल्हा औरंगाबाद येथील हॉटेल ब्ल्यु मुन बियरबार परमीटरुम सुरळीत चालु ठेवण्यासाठी व कारवाई न होवूदेण्यासाठी आरोपी लोकसेवक श्री. डांगर यांनी रुपये 25000/- ची मागणी करित असल्याने तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दि. 22/03/2022 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद या कार्यालयात तक्रार दिली.<br>फिर्यादी यांचे तक्रारीवरुन दि.22/03/2022 रोजी केलेल्या पडताळणी दरम्यान आ.लो.से. यांनी फिर्यादी यांना रुपये 20000/ मागणी करुन तडजोडीअंती रुपये 20000/- स्विकारण्याचे मान्य केले बाबत निष्पन्न झाले.<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद तर्फे आजच दि. 22/03/2022 रोजी सापळा आयोजीत केला असता, आरोपी लोकसेवक श्री. डांगर यांनी पंचासमक्ष लाचेची मागणी करुन फिर्यादीचे औरंगाबाद येथील हॉटेल स्वराज बिअर शॉपी शहानुरवाडी येथे लाचेची रक्कम रुपये 20000/- स्विकारल्यानंतर आ.लो.से. यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पोलीस स्टेशन जहवाहरनगर औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

सदर कारवाई, पोलीस अधीक्षक मा.डॉ.राहुल खाडे, अपर पोलीस अधीक्षक मा. विशाल खांबे, पोलीस उप अधिक्षक श्री. मारुती पंडीत यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक- श्री. हनुमंत वारे, यांनी कारवाई केली आहे. त्यांना सदरच्या कारवाई कामी पोअंमदार- साईनाथ तोडकर, मिलिंद इप्पर, केवलसिंग घुसिंग, यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना अवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

| | |
|---|---|
| संपर्क पत्ता | :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| ई- मेल | :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com |
| ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन | :- acbmaharashtra.net फेसबुक:- www. facebook. com-Maharashtra.gov.in |
| संपर्क क्रं. | :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064, पोलीस अधीक्षक :- 8888807299 |
| अपर पोलीस अधीक्षक | :- 8788644994    पोलीस उप अधीक्षक :- 9356115189 |

(मारुती पंडीत)
**पोलीस उप अधीक्षक,**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद**